महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (आस्थापना शाखा)
मेन रोड, धाराशिव , पिनकोड–413501
दुरध्वनी क्र.02472-225618 , Email – dcosmanabad@gmail.com,

जा.क्र.2010/महसूल/आस्था-1/सीआर-07

दिनांक:- 19 /08/2025

## निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीकरिता 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी' हे पद भरण्यासाठी जाहिरात

जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयासाठी **'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी'** हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीसाठी भरण्याकरिता दिनांक 21.08.2025 ते दिनांक 04.09.2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

1. **पदाचे नांव:** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
2. **पदसंख्या:** एक
3. **काल मर्यादा:** निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, 11 महिन्याच्या कालावधीसाठी. (परिस्थती नुसार 11 महिन्यानंतर मुदतवाढी बाबत निर्णय घेण्यात येईल.)
4. **ठोक वेतन:** रुपये 75,000/- प्रति महिना (या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते नाहीत)
5. **शैक्षणिक अर्हता:** मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)
6. **अनुभव :** I) 3 वर्षाचा अनुभव त्यातील किमान 2 वर्ष आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव असावा.
   II) मराठी व इंग्रजी भाषाचे चांगले ज्ञान असणे इष्ट.
   III) टिपणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य.
   IV) शासकीय कामाच्या अनुभवास विशेष प्राधान्य देण्यात येईल.
   वरील बाबीची पुर्तता होत असल्यास व प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास अशा उमेदवाराचा सदर पदासाठी विचार केला जाईल.

**7. अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या शासकीय स्व-साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे बंधनकारक आहे.**

I). किमान शैक्षणिक अर्हता व त्यावरील शैक्षणिक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
II). शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला.
III). 3 वर्षाचा अनुभव त्यातील किमान 2 वर्ष अनुभव आपत्ती व्यवस्थापनातील असल्याबाबत प्रमाणपत्र.
IV). शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
V). प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
VI). महाराष्ट्रातील रहिवाशी प्रमाणपत्र.
VII). लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

**8. पात्रतेच्या अटी व शर्ती:-**

I) इच्छुक उमेदवारांनी भरती प्रक्रियेचे विविध टप्पे व मुलाखतीसाठी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.dharashiv.maharashtra.gov.in वर नमूद दिनांक व वेळेनुसार उपस्थित रहावे. पोस्टामार्फत पत्र पाठविण्यात येणार नाही. आवश्यकता भासल्यास मेल द्वारे कळविण्यात येईल.

II). निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

III) उमेदवाराने त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

IV). निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास, त्या उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

V). अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही. सदरची नियुक्ती ही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पदाकरीता शासनाची मुदतवाढ मिळेल याचे अधिन राहून देण्यात येत आहे.

VI) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने रुजू होणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रदद होईल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवड सुचीतील प्रतिक्षायादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

VII). मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल

VIII). उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर चारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असल्यास नियुक्ती रदद करण्यात येईल

**9. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदा-या :-**

I). जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व त्याचे अद्यावतीकरण, विचार विनियम कार्यशाळा आयोजित करणे, आराखड्याची व्यवहार्यता तपासणे, रंगीत तालीम घेणे, आपत्ती व्यवस्थापनासंबंधी विभागाचे आराखडे तयार करणे.

II). नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती येण्यापूर्वी, आपत्ती सुरू असतांना व आपत्तीनंतर करावयाच्या उपाययोजना बाबत समियंत्रण करणे.

III). संस्थात्मक मजबुतीकरण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मजबुतीकरण, आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत संस्थांचे प्रशिक्षण, सामाजिक कार्य महाविद्यालय, इस्पितळांची सज्जता,जिल्हा आपतकालीन कार्यकेंद्राची सज्जता.

IV). प्रशिक्षण व सक्षमीकरण प्रशासन, अभियंते, वास्तुविशारद, डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, गवंडी, विद्यार्थी व शिक्षक, प्रसारमाध्यमे, उद्योग जगत यांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण.

V). जनजागृती कार्यक्रम रोड शो, लोकगीते, पोवाडे, पथनाट्य, भिंतीचित्रे, जाहिरात फलक, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, अभ्यासक्रमा व्यतिरिक्त स्पर्धाचे आयोजन, रेडीओ जिंगल्स इत्यादी मधुन जनजागृती करणे

VI). जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार जिल्हा प्राधिकरण, अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांचे तोंडी व लेखी आदेशानुसार कामकाज करणे.

**10. विशेष सूचना :-**

I). उमेदवाराने आपला सोबतच्या नमुन्यातील अर्ज A-4 साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित/हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव - 431501 या पत्यावर **दिनांक 21.08.2025 ते दिनांक 04.09.2025 रोजी 05.00 वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे समक्ष सादर करावेत.** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा जाहिरात व अर्जाचा नमुना या कार्यालयाचे वेबसाईट www.dharashiv.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे.

II). जाहिरातीपुर्वी व जाहिरातीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त तसेच अपुर्ण, अर्धवटरित्या भरलेले, चुकीचे भरलेले अर्ज वा काही त्रुटी आढळून आल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

III). अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

IV). भरती प्रक्रिये संदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र धाराशिव राहील.

V) निवड झालेल्या उमेदवारास कामावर रुजू होणेबाबत या कार्यालयाचे संकेतस्थळ www.dharashiv.maharashtra.gov.in वर प्रसिद्धीपत्रकाद्वारे/ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच विहीत नमुन्यातील करारनामा नियुक्तीनंतर सात दिवसाचे आत रु.500/- चे बॉन्डवर करुन देणे बंधनकारक राहील.

VI). एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांनी राखुन ठेवले आहेत.

VII). तसेच प्राप्त अर्जाच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ www.dharashiv.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.

किर्ती किरण पुजार (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी धाराशिव